SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004, MAHARASHTRA
Phone : EPABX –2609000 Special Cell –2609148
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./विशेष कक्ष/ All college/84 दिनांक :- 27 JUN 2018

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय**— बिंदुनामावली तपासणी शिबिराबाबत...

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांनी बिंदुनामावली स्थापित केलेली नाही किंवा गत तीन वर्षामध्ये त्याची तपासणी करून घेतलेली नाही. अशा महाविद्यालयांसाठी विद्यापीठामध्ये सप्टेंबर, २०१७ मध्ये जिल्हानिहाय बिंदुनामावली तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर तपासणी शिबिरासाठी महाविद्यालयांनी चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला होता. त्याचप्रमाणे जुलै, २०१८ मध्ये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांसाठी जिल्हानिहाय बिंदुनामावली तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

तेंव्हा, उपरोक्त विषयासंदर्भात आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी अद्याप झालेली नाही किंवा ज्यांची बिंदुनामावलीची यापूर्वी तपासणी होवून तीन वर्षे पूर्ण झाली आहेत किंवा काही कारणास्तव पदे रिक्त झाली असून बिंदुनामावली अद्ययावत करण्याची आहे, अशा महाविद्यालयांनी विद्यापीठाने यापूर्वी पाठविलेल्या विहित नमून्यामध्ये (www.unishivaji.ac.in ➔Special Cell ➔ Teaching & Non-Teaching Bindunamavali Proposal format या पाथवर नमूना उपलब्ध आहे.) प्रस्ताव शिबिरात सादर करावेत. तसेच, दिनांक १० जुलै, २०१८ पर्यंत विद्यापीठास महाविद्यालयांनी सोबतच्या नमूना अर्जामध्ये नांवे नोंदवावीत.

उपरोक्तप्रमाणे विहित वेळेत नांव नोंदविणाऱ्या महाविद्यालयांच्या प्रस्तावांच्या बिंदुनामावलीची शिबिरामध्ये तपासणी करून देण्यात येईल. तपासणी शिबिराचा सविस्तर कार्यक्रम विद्यापीठ संकेतस्थळावर १० दिवस अगोदर जाहीर करण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव

# बिंदुनामावली तपासणीसाठी अर्जाचा नमुना

संस्थेचे नाव :— ———————————————————————————————

महाविद्यालयाचे नाव व पत्ता :———————————————————————————

ई मेल ——————————————————————————————————

बिंदुनामावली तपासणी प्रकार :— अनुदानित / विनाअनुदानित———————————

बिंदुनामावली प्रकार :— शिक्षक/ शिक्षकेत्तर ————————————————

यापुर्वी बिंदुनामावली तपासणी केलेली दिनांक:— ——————————————

बिंदुनामावली कामकाज करण्या—या प्रतिनिधीचे नाव व हुदद्दा :——————————

बिंदुनामावली कामकाज करण्या—या प्रतिनिधीचा मोबाईल नंबर:———————————

बिंदुनामावली तपासणी प्रकार—

अ) तीन वर्षानंतरची नियमित तपासणी

ब) रिक्त झालेल्या पदामुळे अद्यावत (update) केल्यामुळे तपासणी

दि—

शिक्का प्राचार्य